# भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील उपेक्षित स्त्रिया

**ज्योती बाबासो हारुगडे**
संशोधक विद्यार्थीनी
श्री शिव-शाहू महाविद्यालय सरुड

**प्रस्तावना**

भारताच्या स्वातंत्र्याला नुकतीच ७५ वर्ष पूर्ण झाले या स्वातंत्र्याच्या यज्ञात अनेक लोकांच्या बलिदानाची समिधा आहे. या स्वातंत्र लढ्यात समाजात दुय्यम मानला जाणारा घटक म्हणजे स्त्रिया त्यांचा सुद्धा मोठ्या प्रमाणात सहभाग होता पण त्या अपेक्षितच राहिल्या. प्राचीन काळापासून भारतीय इतिहासात स्त्रिया सक्रिय असूनही त्या दृश्यमंय राहिल्या. पाश्चात त्यांच्या आगमनाने मध्येही वैचारिक कल्पनांचा शेवट होऊन आधुनिक विचारांना सुरुवात झाली. राजाराम मोहन रॉय यांच्या प्रकल्पातील ही परिवर्तन जीवनात उतरले गांधीजींच्या प्रेरणेने वरिष्ठ वर्गापासून सामान्य स्त्रिया राजकारण व समाजातील विधायककार्य कडे वळल्या क्रांतिकारी चळवळी, असहकार चळवळ, संप, मोर्चे इत्यादी मार्गांनी स्त्रियांचा राजकीय जीवनाशी परिचय झाला. क्रांतिकारी चळवळी करण्यापर्यंत स्त्रिया अग्रेसर होत्या. पण इतिहासात त्यांच्या कार्याचे म्हणावे असे कौतुक झाले नाही आणि दखलही घेतली नाही. सामाजिक रुढी, परंपरा, बंधने असूनही स्त्रिया स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाल्या. निवडक स्त्रियांचा परिचय त्यांची प्रासंगिकता या लेखातून मांडण्याचा प्रयत्न ह्या करीत आहोत. आजही समाजात आणि गावात स्त्रियां अनेक समस्यांना सामोरे जाताना दिसतात. स्त्रियांना त्यांच्या आरोग्यासंबंधात असो हक्कासंदर्भात असो किंवा विचार स्वातंत्र्य सबंधात असो स्त्रिया पाठिमागे पडताना दिसतात. राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढवा म्हणून त्यांना ३३ % आरक्षण देण्यात आले आहे. पण तरीही त्या स्वतंत्रपणे व्यक्त होताना दिसत नाही. संपूर्ण राज्यकारभार हा पतीच्यामारर्फतच बघितला जातो. काही ठिकाणी तर महिलांचा सहभाग सुद्धा दिसत नाही. देशाची अर्धी लोकसंख्या असून सर्वंच बाबतीत त्या मागे पडताना दिसतात. गांधीजींच्या आगमनाबरोबर स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांचा सहभाग वाढला. आपले तारुण्य, घरसंसार, मुलबाळ, प्राणाची पर्वा न करता क्रांतिकारक चळवळीमध्ये स्त्रिया सहभागी झाल्या. त्यांनी पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य साठी लढा दिला त्रास सहन केला त्या महिलांचे योगदान विस्मृतीस गेले आहे. शोधनिबंधनाचे सार स्त्री जीवनावर पूर्ण असा प्रभाव टाकणाऱ्या महत्त्वाच्या संस्था म्हणजे कुटुंब ,नातेदारी व्यवस्था ,विवाह संस्था वंश .वारसाव्यवस्था आणि धार्मिक परंपरा इत्यादी असून कोणत्याही कालखंडातील समाजमनाने आपल्या वेळेच्या स्त्रिया यांना दिलेले स्थान विचारात घेणे आवश्यक आहे .कोणत्याही समाजात स्त्रियांना सामान्यता कोणत्या अधिकार उपलब्ध आहेत त्यांनी कोणती कर्तव्य पार पाडली पाहिजे तसे त्यांच्या वर बंधन आहे आणि हे हक्क व ही कर्तव्य त्यांच्याकडून कशा रीतीने कार्यान्वित होतात या बाबींवर त्या समाजातील स्त्रियांचा दर्जा अवलंबून असतो अर्थात हा दर्जा पुरुषांच्या तुलनेने ठरविण्याचा प्रयत्न केला जातो.

**शोध निबंधाचे सार**

प्रदीर्घ सांस्कृतिक परंपरा लाभलेला वैविध्यातूनही एकता शोधणारा विस्तीर्ण, अज्ञान, दारिद्र्य, विषमता, यामुळे पोखरलेला असूनही चिवटपणे ब्रिटिशांना अहिंसात्मक मार्गाने आव्हान देणारा भारत हा जगातील एकमेव उदाहरण आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळी ही सर्वात मोठी लोक चळवळ होती .तिच्यामधील लाखो स्त्री पुरुष जात-पात उच्च-नीचता यांची स्वतंत्र ओळख विसरून एकत्र आले. त्यामुळे साम्राज्यवादी ब्रिटिश जागतिक सत्तेला भारतातून माघार घेणे भार पडले. या चळवळीत स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. पण त्यांच्या सहभागाचा इतिहास मात्र १९७५ नंतर अक्षरबद्ध होऊ लागला. १९७५ ते ८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकात भारतातील व भारताबाहेरील संशोधक स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचा सहभागाबद्दल लिहू लागली. पण हा इतिहास सुद्धा बऱ्याच उच्च वर्गातील स्त्रियांच्या सहभागापुरताच मर्यादित राहिला म्हणून आपण त्याला वरिष्ठ वर्गातील स्त्रियांचा इतिहास असे म्हणू शकतो. कामकरी, शेतकरी वर्गातील ज्या स्त्री आणि या चळवळीला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग दिला त्यांचा इतिहास साधना भावी उपेक्षितच राहिला. १९८५ ते १९२० या मवाळवादी व जहालवादी कालखंडात स्त्रियांचा स्वातंत्र्य चळवळीतील प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग उच्चभ्रू स्त्रियांमार्फतच मर्यादित राहिला. पण १९२० ते १९४७ या

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील कालखंडात स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचा सहभाग लक्षणीय ठरला. १९८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर भारतीय राजकारणाला चालना मिळाली.१९८९ नंतर पंडिता रमाबाईंच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसच्या अधिवेशनाला काही स्त्रिया हजर होत्या. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या १९८५ ते १९०५ या कालखंडात मवाळ नेत्यांचा कॉंग्रेसवर प्रभाव होता. वंगभंग आंदोलनानंतर स्त्रियांनी जाहीरपणे ब्रिटिशांविरुद्ध आंदोलनामध्ये भाग घेण्यास सुरुवात केली. गांधीजींच्या नेतृत्वामुळे सर्व स्तरातून भारतीय स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत आल्या. त्यांचे प्रेरणास्थान महात्मा गांधीच होते .गांधीजींनी स्त्री शक्तीला प्रथम जाणीव आफ्रिकेमध्ये करून दिली आफ्रिकेतील सत्याग्रहाचे नेतृत्व करताना गांधीजींनी स्त्रियांना पाहिले तेव्हा त्यांना जाणवली की पुस्तकी विद्यालय नव्हे तर सहनशक्ती व विश्वास यातून निर्माण झालेले कणखर मन हे नेतृत्वासाठी जरूर आहे .हरिजन ( ११ डिसेंबर १९३८ ) टॉलस्टॉय च्या लिखाणातून व पत्नी कस्तुरबा यांच्यापासून त्यांना सत्याग्रहाची प्रेरणा मिळाली टिळकांच्या नेतृत्वाखाली स्वदेशी ,स्वराज्य ,बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यां चतुसूत्रीच्या कार्यक्रमांमध्ये बंगाल आणि महाराष्ट्रातील अनेक स्त्रिया सामील झाल्या. त्यामुळे स्त्रियांमध्ये चेतना निर्माण होऊन रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षतेखाली १९०४ साली झालेल्या अखिल भारतीय स्त्रियांच्या सभेत विविध प्रांतीय स्त्रीया एकत्र आल्या. १९०५ मध्ये बंगालच्या फाळणी नंतर झालेल्या वंगभंग आंदोलनातील स्त्रियांचे सहभाग लक्षात येण्यासारखे होते पण या स्त्रिया शहरातील उच्चवर्णीय सुशिक्षित बुद्धिजीवी वर्गातून आल्या होत्या. इतिहासामध्ये स्त्रियांचे स्थान हे वेगळ्या दर्जाचे आणि महत्त्वाचे आहे आतापर्यंत आपण बघतो आहे की सर्व क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर काम करताना दिसतात पण देशाच्या स्वातंत्र्यासाठी ही भरपूर स्त्रियांनी प्राण्याचे बलिदान दिलेले दिसते त्यांचे योगदान देशा मध्ये महत्त्वाचेच असे आहे. स्त्रिया व काम हा विषय जरी सोप्पा साधा व नैसर्गिक दिसला तरी तो गुंतागुंतीचा विषय आहे. सर्व स्त्रिया कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचे काम करीतच असतात फरक फक्त कोणत्या स्वरूपाचे काम करतात एवढाच असतो घरात, शेतात, हॉस्पिटलमध्ये, कार्यालयात उद्योग धंद्यात स्त्रिया काम करीत असतात हे पाहण्यात येते परंतु तरी स्त्रियांचे सामाजिक उत्पादक काम कोणती असा प्रश्न निर्माण होतो. स्त्रियांनी कोणते काम करावे कसे करावे, हे सर्व पुरुषप्रधान मूल्यवस्थेच्या चौकटीतच ठरते स्त्रियांची आर्थिकता दासत्वपर अवलंबन हे त्यांचे शोषणास कारणीभूत ठरते. परिणामी त्या सामाजिक न्याय व मानवी अधिकारापासून वंचित ठेवल्या जातात कार्ल मार्क्स व गांधीजी या दोघांनी स्त्री आणि पुरुषांच्या भूमिकेतील ताठर भेदाभावास विरोध केला समाजाच्या विकासासाठी समाजातील सर्व लोकांनी पूर्णपणे सहभागी होणे व स्त्रियांच्या सामर्थ्याच्या संपूर्ण विकास होण्यासाठी त्यांना संधी मिळणे आवश्यक आहे. उत्पादन साहित्य सहभागी झाल्या म्हणून त्या मुक्त होतील किंवा त्यांच्या कौशल्याचा विकास होईल असे नाही. १९ व्या शतकात ब्रिटिश अंमल प्रस्थापित होऊन भारत पारतंत्र्यामध्ये जखडला गेला आणि त्याचबरोबर याच व्यक्ती स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव, बुद्धिवाद, लोकशाही उदाहरणात इत्यादी वसाहतीला हलवून सोडणाऱ्या नव विचारांचे प्रवाह इंग्रजी भाषेच्या मदतीने आपल्याकडे वाहू लागेले. यास तुम्हालाच ब्रिटनमध्ये रिफॉर्म बिलाची व स्त्री स्वातंत्र्याची चळवळी उदय पावत होती. इंग्रजी भाषेच्या वाघिणीचे दूध प्यायलेली विचारवंताची पिढी या सर्वांना विचारांची अक्षरशा दिपून गेली. समाजाकडे व्यक्तीकडे पाहण्याची एक प्रकारची नवी दृष्टी तिला प्राप्त झाल्यासारखे झाले. यातूनच आपला धर्म, चालीरीती, परंपरा या नावाखाली आपण काय काय अन्याय करतो याची कृतीसदृश्य त्यांच्यासोबत उभे राहून त्यांची मने अस्वस्थ होऊ लागली. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या ज्या गोष्टी धर्माच्या नावाखाली आपल्याकडे चालतात त्या बंद होऊन समाजात नवचैतन्य आल्याखेरीज तरुणोपाय नाही असा ठाम विश्वास त्यांनी केला. अशा मनस्थितीत आई, पत्नी, बहीण, मुलगी भाऊजय, इत्यादी या ना त्यां भारतीय स्त्रीचे वैयक्तिक व सामाजिक निकृष्ट अवस्था त्यांच्या डोळ्यापुढे उभी राहिली ती समाजातील अशा शाळातून गुलामगिरीतून मुक्त करून प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याकरता त्यांनी कंबर कसली यात आश्चर्य नाहीत. ब्रिटिश राजवटीच्या प्रारंभीच्या काळात ईस्ट इंडिया कंपनी व शासकांनी धार्मिक व सामाजिक परंपरांच्या बाबत हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्वीकारले इंग्रजीमध्ये राणी व्हीक्टोरियाने सत्ता प्राप्त केल्यावर आपले धोरण जाहीर केले की आमच्या अतत्यारीतील अधिकाऱ्यांनी आपल्या हिंदू व मुस्लिम जनतेच्या धार्मिक श्रद्धा व पूजा स्थळांबाबत हस्तक्षेप केल्यास आमच्यावर अशाच कारणीभूत ठरतील ब्रिटिशांच्या राजवटीत सामाजिक आणि धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याच्या त्यांच्या सर्वसाधारण धोरणामुळे भारतातील विविध धार्मिक समुदायांचे स्वतःचे असे स्वातंत्र्य विविध

नागरी कायदा चालू राहिली परंतु या धोरणानंतरही ब्रिटिश राज्यकर्त्यांनी न्याय निर्णय व कायद्याद्वारा भारतीय सामाजिक संबंधात व कुटुंबात हस्तक्षेप केला. त्या प्रत्येक भूमिकेत आपली जबाबदारी व जाणीव दृष्टीने पाहताना दिसतात त्या सर्वच बाबतीत आघाडीवर असतात पण त्याला त्यांना अजूनही समाजात कमी लेखलं जातं त्यांच्या कार्याची म्हणावि अशी दखल घेतली जात नाही. स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात ही त्यांनी आपल्या प्राण्याची प्राणाची परवाना करता वाहून घेतलेले दिसते त्यांनी केलेले कार्य हे महत्त्वाचे आहे आणि ते देश स्वातंत्र्यामध्ये अगदी आघाडीवर आहे. पण अगदी ठराविक स्त्रियांची नावे आपल्या लक्षात येतात ज्यांनी स्वातंत्र्याच्या यज्ञात आपल्याला वाहून घेतलेली दिसतात. काही अशाही स्त्री आहेत त्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या क्रांतिकारकांना मदत केली मदत केली देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटत राहिला पण त्यांच्या कार्य त्यांच्या कार्यापासून आपण अनभित्तच आहोत.

**१) मॅडम भिकाजी कामा ( २४ सप्टेंबर १८६१ ते १३ऑगस्ट १९३६ )**

मुंबईतील सौरबजी पटेल यांच्या कन्या १८८५ मध्ये रुस्तमजी कामाशी त्याचा विवाह झाला.प्लेगच्या साथीच्या काळात केलेल्या मदतीने अतिश्रमाने त्या आजारी पडल्या व लंडनला गेल्या. व तिथे दादाभाई नौरोजी यांच्या स्विय सचिव बनल्या. १९०७ मध्ये जर्मनीच्या स्टुटगार्ट नगरात आयोजित आंतरराष्ट्रीय समाजवादी संमेलनात भाग घेऊन त्यांनी भारताचा राष्ट्रध्वज फडकवला. यामध्ये वरच्या लाल रंगातील १८ कमळे तत्कालिन प्रदेशाचे प्रतिक मधल्या केशरी पट्टावर डाव्या बाजूला उगवता सूर्य होता. या मधील लाल रंग-शक्ती, केशरी विजय, हिरवा उत्साह यांचे प्रतीक होते. हे तिरंग्याचे रुप मादाम कामा यांच्या बुद्धिची साक्ष होती. १८ ऑगस्ट १९०७ च्या भरलेल्या विश्व समाजवादी परिषदेत त्या म्हणाल्या भारतात ब्रिटिशांचे साम्राज्य असणे घोर अपमानाचे असणे म्हणजे आमच्या घोरपमानाचे व सर्वनाशाचे सूचक आहे. १९०८ मध्ये लंडनच्या इंडिया हाऊस मध्ये त्या म्हणाल्या पुढे चला मित्रांनो, पुढे चला, पुढे चला हेच गीत कदम कदम बढाये जा या नावाने आझाद हिंद फौजेचे प्रचार गीत बनले. इंग्लंडमध्ये त्यांच्यावर निघालेल्या पकड वॉरंट मुळे फ्रान्स हे कार्यक्षेत्र बनवले. १८५७ च्या युद्धाची सुवर्ण जयंती सावरकरांच्या मदतीने साजरी केली. मादाम कामांना प्रतीक आणि रंगांचा असणारे ज्ञान यावरून त्यांना अपरिमित बुद्धी लक्षात येते आपल्याला सुभाषचंद्र बोस यांचे कार्य माहीत आहेत पण शेकडो क्रांतिकारकांना स्फूर्ती देणाऱ्या त्यांचे हे गीत ही मॅडम कामांचीच देणगी आहे. स्त्रियांना नाविन्यपूर्ण गोष्टी करण्याची आणि आपले वेगळेपण सिद्ध करण्याची कला जन्मताच प्राप्त झालेली असते. मानवाच्या जीवनाला गती देणारे गती प्राप्त झाली. म्हणजेच हडप्पा संस्कृती जेव्हा शेतीचा प्रारंभ झाला त्याचे श्रेय हे स्त्रियांना द्यावे लागेल. कृषीप्रधान असणाऱ्या या भारत देशात प्राचीन काळापासूनच स्त्रियांची योगदान अमूल्य आहे. तरीही बळीच राज्य म्हटले जाते हेच मोठे दुर्दैव आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात आज स्त्रिया आपला ठसा उमटवताना दिसतात नवनिर्मित शक्ती त्यांच्या जन्मताच असलेली दिसते कल्पना चावला, किरण बेदी, मदर तेरेसा, प्रत्येक क्षेत्रातील स्त्री आपल्या कार्यामध्ये अग्रेसर असताना दिसते. त्यांनी आपल्या कला कौशल्याने संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे वेधले आहे. ज्या मदर तेरेसानी चला पुढे चला मित्रांनो पुढे चला असे गीत आणि प्रेरणा दिली अशी प्रेरणा देणारी आजची गीते आहेत का ? त्यातून काय संदेश दिला जातो समाजाला हे पाहिलं पाहिजे.

**२) भगिनी निवेदिता.**

या स्वामी विवेकानंदांच्या शिष्या यांचा जन्म आर्यलंड मधील अस्तर मध्ये झाला. त्यांची मूळ नाव मार्गारेट नोबेल होते. १९९८ ला भारतात आल्यावर त्यांनी स्त्री शिक्षण विषयक जागृती केली. बडोद्यातील स्वामी अरविंद यांची काम पाहून त्यांनी आपले ग्रंथालय क्रांतिकारकांना दिले. १४ वर्षे त्या संन्यासीनी म्हणून कार्यरत होत्या. वंगभंग आंदोलनाच्या वेळी राष्ट्रीय भावनेने प्रेरित असणाऱ्या त्यांच्या कविता लोकप्रिय झाल्या. दुष्काळ पूर काळात त्यांनी सामान्य भारतीयांची सेवा केली. त्या स्वदेशीचा प्रचारक होत्या उपेंद्र दत्त यांनी सुरू केलेल्या युगांतर या वृत्तपत्रामागे त्यांची प्रेरणा होती. त्यांच्या बाग बाजारीतील घरी अरविंद घोष, बाळकृष्ण बिपिनचंद्र पाल, इत्यादी क्रांतिकारी चर्चेसाठी येत त्यांनी प्रामुख्याने हिंदू धर्म, दर्शन व संस्कृती यावर आधारित जनजागरण महिलांचे शैक्षणिक प्रगती यावर भर दिला. दुसऱ्या देशातून भारतात येऊन त्यांनी केलेले कार्य हे महत्त्वाचे आहे. त्यांनी स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणूनही कार्य केले. पण याची जाणीव काही सुशिक्षित समाजाला आज पाहायला मिळत नाही. आपला

धर्म संस्कृती चालीरीती यापासून समाजाला काही स्त्रिया वेगळ्या पडलेल्या दिसतात. जगात श्रेष्ठ असणाऱ्या आपल्या संस्कृतीमध्ये काही स्त्रिया दागिने आणि कपड्यांच्या बाबतीत पाश्चात त्यांचे अनुकरण करताना दिसतात की त्यांना आपल्या संस्कृतीचा विसर पडलेला दिसतो. समाजात आज ज्या काही विक्षिप्त घटना घडतात दिसतात आणि त्याची भयानक परिणाम अनुभवायला मिळतात. ती आपली संस्कृती आणि परंपरेला मोठा ओरखडा दिसतो. सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी जी काही धडपड केली आणि समाजातील आणि समाजातील लोकांचे लोकांकडून असभ्यवर्तनही सहन केली. समाजात स्त्रियांना चांगल्या प्रकारे वागणूक मिळावी शिक्षण मिळावे त्यांचे संरक्षण व्हावी हाच सावित्रीबाई आणि जोतिबा फुले यांचा दृष्टिकोन होता. पण आजची स्त्री सुशिक्षित आहे का? हा प्रश्न पडतो कारण निर्भयासारख्या आणि कोपर्डी सारखे काही घटना घडताना दिसतात. त्यावरून सुरक्षेचा प्रश्न उद्भवतो.

**३) सरलादेवी चौधरी -**

रवींद्रनाथांची भाची व पहिली महिला कादंबरीकार स्वर्णकुमारी यांची कन्या सरलादेवी हिचे स्थान क्रांतिकारी इतिहासात अटळ आहे. क्षत्रिय त्यांनी महाराष्ट्रातील शिवजयंती व गणपती उत्सवाप्रमाणे राणा प्रताप आदित्य उत्सव, विराष्टमी आणि महाकाली उत्सव याद्वारे स्वातंत्र्याचा चळवळ आंदोलनाला जोडली .

अरविंद भाऊ, बिपिन चंद्र पाल, व सरलादेवी सदृढ सोसायटीचे प्रमुख होते. याच सोसायटीच्या १८ शाखांमध्ये कलकत्त्याची वृत्ती व शक्ती समिती तसेच सेवक समिती मुख्य होत्या. त्यातून वंगभंग विरोधी व टीकांच्या जहाल विचारांचा प्रसार कसा केला जाईल, तसेच रिवाल्वर शूटिंग दहशतवादी कृत्ये दरोडा असं कराचे प्रशिक्षण दिले जाईल. त्या अखिल भारतीय क्रांतिकारी दल भारत स्त्रीमंडळ अखिल भारतीय सामाजिक संघ, वंग साहित्य संमेलन यामध्ये कार्य करीत लाहोर षडयंत्र केस मध्ये पंजाब दिल्लीतील कार्यकर्त्यांना पोस्टर व महत्त्वाची कागदपत्रे पोहोचविण्यात त्या प्रमुख होत्या. १९०५ च्या राष्ट्रीय अधिवेशनात गोखले निबंध चंद्राचे वंदे मातरम म्हणण्याची सरला देवीने प्रार्थना केली. त्यांचे कार्य क्रांतिकारकांची संघटन प्रशिक्षण व नेतृत्व यामध्ये अग्रगण्य होते. आपल्या लेखनावर प्रेम करणाऱ्या क्रांतिकारकांना वीरमरण पत्करण्यासाठी त्या भाग पाडित महिला असून सुद्धा कशाप्रकारे योग्य ठरतील याची जाणीव त्यांना झाली, आणि त्यांनी तशाच प्रकारची उत्सव आपल्या प्रांतात चालू केलेला दिसतो. असे मार्ग स्वातंत्र्य मिळण्यासाठी किती स्पर्धेत होते याची कल्पना त्यातूनच दिसून येते पण आता धार्मिक समस्या देखील दिसतात, त्यामध्ये लोक जरी संघटित होत असले तरी त्यातून होणारी साध्य निष्पत्ती अगदी शुल्लक आहे. फक्त मनोरंजन करण्यासाठी आणि आणि वेगवेगळ्या सिस्टीम चा वापर करून त्यातून वेगळे आजारांचा फैलाव करण्यास जबाबदार दिसते. आजचे सण जरी प्राचीन काळापासून सुरू होत असले तरी त्यातून मिळणारी प्रेरणा आणि समाजासाठी असणारे महत्त्व हे खूपच महत्त्वाचे आहे. पण आजच्या सणातून हे प्रकट होताना दिसत नाही. आजही आपण पाहतो सरला देवी सारख्या शूटिंग मध्ये कार्यरत असणाऱ्या ज्याने भारतासाठी मेडल मिळवलं असा काही महिलाही आहेत. त्यामध्ये राही सरनोबत, तेजस्विनी सावंत यांसारख्या स्त्रियांचा समावेश होतो म्हणजेच रिवाल्वर शूटिंग हे सुद्धा स्वातंत्र्यासाठी किती महत्त्वाचे आहे हे सरलादेवी चौधरी यांनी दाखवून दिलं.

**४) क्रांतिकारी शहीद प्रीती लता वडेड्दार**

५ मे १९११ या या चितगाव शस्त्रागारकांड १९३० मधील प्रमुख नेता सूर्य सेन यांच्या क्रांतिकारी दलाच्या सदस्य होत्या. प्रितीलत्ता व सूर्यसेन यांच्याबरोबर झालेल्या चकमकीत कॅप्टन कॅमरान मारल्याने ते भूमिगत झाल्या. त्या काळात अपूर्व सेन निर्मल सेन या साथीदारांचा मृत्यूचा बदला घेण्यासाठी प्रीतीला त्याच्या नेतृत्वाखाली चितगाव येथील रेल्वे क्लबवर हल्ला केला. २४ सप्टेंबर १९३२ यामध्ये एक युरोपियन महिला मृत्यू पावली. तर १३ इंग्रज जखमी झाले. प्रीतीला गोळी लागली पोलिसांच्या ताब्यात जाण्यापेक्षा जखमी अवस्थेत सायनाइट खाऊन आत्महत्या केली. वयाच्या २३ व्या वर्षी तिने वीरमरण पत्करले. सुरेश यांच्यासाठी रामकृष्ण विश्वास कोलकत्या मधील अलीपुर जेलमध्ये होता त्याला भेटन कठीण होतं पण तरी प्रीतीलता त्याला ४० वेळा भेटल्या. कुठल्याही अधिकाऱ्याला त्यांच्यावर संशय नाही आला, ही तर त्यांची बुद्धिमत्ता आणि ह्या बहादूरीचे उदाहरण आहे. वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी मृत्यू म्हणजे देशासाठी अभिमानाची गोष्ट आहे. प्राचीन काळापासूनच आधुनिक काळापर्यंत भारतीय इतिहासात अनेक स्त्रियांचं स्थान कथा ऐकून आहोत. त्यामध्ये अहिल्याबाई होळकर असेल

ताराराणी, जनाबाई, बहिणाबाई, ताराबाई शिंदे, जिजामाता झाशीची राणी यांसारख्या स्त्रियांनी आपल्या धाडसीपणाच्या जोरावर मुघलांना आणि इंग्रजांना सळो की पळो करून सोडलं होतं.

**५) कल्पना दत्त**

यांचा जन्म १९१४ मध्ये चितगाव येथे झाला डॉक्टर खास्तगीर बालिका स्कूलमध्ये शिकताना त्यांच्यावर क्रांतिकार्याचा प्रभाव पडलेला. क्रांतिकार्यासाठी स्वतःची शरीर त्यांनी व्यायामाने सदृढ बनवले वयाच्या चौदाव्या वर्षी त्या क्रांतिकारी कार्यात सहभागी झाल्या. गर्वाने जगायचे असेल तर गुलामीचा कलंक दूर करा शक्ती संपादन करा व क्रांतिकारकांना साथ द्या असे त्यांनी सांगितले. १९२२ नंतर सेनेच्या क्रांतीदलात सामील झाली. लाठी, तलवारी, पिस्तूल वापरण्याचे सरावाने गोळ्याच्या वर्षावातून सुटणारी भांडी प्रदेशातून लपून पोलिसांना फसवणारी क्रांतिकारक म्हणून ती प्रसिद्धीस आली. चितगाव खटल्यातील दिनेश गुप्त व रामकृष्ण यांना फाशी देण्यासाठी डायनामाइटने उठाव करण्याचा ठरला. त्यामध्ये गणेश कोश व लोकनायक बल इत्यादी पकडले गेले कलम १०९ नुसार मुलींना क्रांती दलात सामील होण्यास प्रवृत्त करणे, हत्यारे पुरवणे यासाठी ती नजर कैदेत राहिली. १६ फेब्रुवारी १९३३ मध्ये सूर्य सेन पकडले गेले. दत्तला सूर्य सेन आणि तारकेश्वर यांना फाशी व कल्पना दत्त जन्मठेपेची शिक्षा झाली. पुरुषांना फाशी शिक्षा व महिला म्हणून मी जन्मभर जेलमध्ये का? तिथेच तिने चितगाव शस्त्र गालावरील हल्ल्याच्या आठवणी लिहिल्या. १९३९ मध्ये महात्मा गांधी रवींद्रनाथ टागोर सीएफ ॲंड्रेस यांच्या प्रयत्नाने सुटली व पुढे कम्युनिस्ट पार्टीत काम करू लागली. १९७९ ला वीर महिला या पदवीने तिला सन्मानित केलं आपण माध्यमिक मध्ये शिकताना क्रांतिकारी लढ्यात सामील झाल्या पण आत्ताच्या माध्यमिक मधील विद्यार्थ्यांमध्ये अशी क्रांतिकारकाची प्रेरणा नाही संपूर्ण वेळ हा मोबाईल सारख्या गोष्टीत जातोय. माध्यमिक शाळेत यांसारख्या महिलांच्या जयंती साजरा करून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला पाहिजे. आणि मोबाईल व इतर गोष्टीवर प्रभावित होऊन उद्याचं भविष्य अंधारात घालवणाऱ्या पिढीला क्रांतिकारक नावीन्यपूर्ण गोष्टी घडवण्यासाठी तयार केले पाहिजे. आपण पाहतोच वेटलिफ्टर मध्ये मीराबाई चानू, मेरी कोम यासारख्या खेळाडू ऑलम्पिक पर्यंत पोहोचले आहेत तसेच सानिया मिर्झा, पी. व्ही. सिंधू ही सुद्धा यांचे टेनिस मध्ये वर्चस्व आहे. चित्रपट प्रसारमाध्यमे यामध्ये सुद्धा स्त्रियांचे वर्चस्व दिसून येतं. ऐश्वर्या राय दीपिका पदुकोण यासारख्या महिला चित्रपटसृष्टीत काम करताना दिसतात.

**६) नागराणी गिडाळू-**

नागराणी गिडाळू यांनी क्रांतिकारी युद्धात जास्त शिक्षा भोगणारी स्त्री म्हणून नागराणी गिडाळू हिला नागालँडची ची 'जोन ऑफ आर्क' म्हणून ओळखले जाते. १९३१ मध्ये तिचा भाऊ जदो नांग ह्याला एका इंग्रजाला मारल्याबद्दल फाशी झाली. त्यामुळे सतरा वर्षाच्या राणीने ४००० नागासैनिकांची फलटण बनवून गनिमी काव्याने इंग्रजांना बेजार केले. जदोनांग आंदोलन करून ब्रिटिशांना देशातून घालवून देण्यासाठी प्रयत्न करत होते. भावाला फाशी दिल्यामुळे आंदोलन राणीच्या हाती आले. इंग्रजांशी संघर्ष करताना आपल्या सैन्याच्या सुरक्षिततेसाठी तिने आसाम मध्ये एक लाकडी किल्ला बनवला. १९३२ ला ब्रिटिशान बरोबर झालेल्या युद्धात राणी पकडली गेली, आणि कैदी बनली त्यांना आजीवन करावासाची शिक्षाही ठरवली. पंधरा वर्षे झाली ब्रिटिशांच्या कैदीत गुवाहाटी आणि शिलाँग मध्ये होती. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्यावर त्यांची सुटका झाली. काही लोक देशासाठी आपले सर्वस्वाचा त्याग करताना दिसतात. देशसेवा हीच ईश्वरसेवा मानणारा काही घटक समाजात आहे. नागराणी यांनी आपलं पूर्ण आयुष्य देशासाठी अर्पण केलेलं दिसतं.

**७) अरुणा असफ अली**

८ ऑगस्ट १९४२रोजी छोडो भारतचा प्रस्ताव मंजूर झाला. ९ ऑगस्ट ला प्रमुख नेत्यांना पकडल्याने मुंबईच्या गोवालिया टँकवर दळणवळणाची साधने नष्ट करून सरकारची प्रशासकीय व्यवस्था विस्कळीत करून भारत स्वतंत्र झाल्याखेरीज हा लढा थांबू नये अशी गर्जना करून, अरुणा असफअली यांनी पोलिसांच्या हाती न लागता ऑल इंडिया कॉंग्रेसची एक प्रतिकचेरीत भूमिगत राहून चालवली. चळवळीचे लोण पसरवण्यासाठी, अरुणा असफलीनी १९०९मध्ये देशभर संचार केला. त्यामुळे त्या १९४२ च्या नेत्या मांनल्या जातात. २६ डिसेंबर १९४२ ला त्यांचे दिल्लीतील घर, संपत्ती, जप्त करून त्यांनी आत्मसमर्पण करावे म्हणून लिलाव केला. डॉक्टर राम मोहन मनोहर लोहिया यांच्याबरोबर त्यांनी इन्कलाब चे संपादन केले. २५

जानेवारी १९४६ च्या त्यांच्यावरील वॉरंट मागे घेतल्यावर त्या प्रकट झाल्या. दैनिक त्रिभुणे त्यांना १९४२ ची झाशीची राणी हा सन्मान दिला. आपल्या संपत्तीची परवा न करता देशसेवेत त्यांनी स्वतःला वाहून घेतले. भारतीय राजकारणात असाही एक समाज अशाही काही व्यक्ती होत्या की ज्यांना देशसेवेशिवाय दुसऱ्या गोष्टींकडे लक्ष नव्हतं. स्वतःची संपत्ती देश सेवेसाठी खर्च करण्याची त्यांची पूर्ण मानसिकता होती त्यांनी संपत्तीपेक्षा देश सेवेला आणि देशाच्या स्वातंत्र्याला महत्त्व दिलेलं दिसते. पण आताच्या तरुण पिढीला स्वतःच्या स्वार्थामुळे समाजात चालणाऱ्या घटकांकडे आणि देश सेवेसाठीवेळ थोड्या प्रमाणात सुद्धा नाही.

**८) उषा मेहता**

काँग्रेसच्या समाजवादी पार्टीच्या नेत्या होत्या. उषा मेहता यांची नाव १९४२ च्या लढयात गुप्त रेडिओ केंद्रासाठी प्रसिद्ध झाले. १४ ऑगस्ट १९४८ ला बाबूभाई व उषा यांच्या प्रसारण सुरू झाले. दर पंधरा दिवसांनी जागा बदलत त्या आपल्या केंद्रातून जनतेला संदेश देत होत्या ब्रिटिशांनी भारत सोडा आपल्या केंद्रातून सामान्य जनतेला घोषणा दिला जात तर वंदे मातरम् ने कार्यक्रम संपत असे. क्रांतिकारकांचे बॉम्बस्फोट जमशेदपूर हरताळ, चिमूरवाडी येथील स्त्रियांवरील अत्याचार याविषयी सर्वात जास्त प्रथम बातम्या या काँग्रेस रेडीओ ने प्रसारित केल्या. अरुणाअसफली व डॉक्टर लोहिया यांची भाषणे व संदेश यावरून प्रसारित केले जात. १८ नोव्हेंबर १९४२ला रेडिओ स्टेशन पोलिसांनी छापा टाकून पकडले व त्यांना चार वर्षाची कैद झाली. वर्षानुवर्षे ब्रिटिशांच्या गुलामगिरीत असणारे आपण आणि भारतीय लोक यांना स्वातंत्र्य करण्यासाठी क्रांतिकारक मोठ्या प्रमाणात प्रयत्न करताना दिसतात. पण त्यांनी आपल्या काही कृतीतून म्हणजेच प्रसारमाध्यमे वृत्तपत्रे यासारख्या गोष्टींचा वापर स्वातंत्र्यासाठी केलेला दिसतो. त्यामध्ये आत्ताच्या पिढीला सोशल मीडियाचा वापर हा फक्त मनोरंजनासाठी करताना दिसतात. त्याच्यातून देशासाठी प्रेरित अशी कोणतीही गोष्ट केली जात नाही. भारतातील बहुसंख्य लोक असोशियन मीडियाच्या आहारी गेले आहेत, आणि त्याचा गैरवापर सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. मोठ्या प्रमाणात ही तरुण पिढी अशा सोशल मीडियावर आपला वेळ वाया घालवत आहे. देशासाठी काहीतरी करण्याची चिकिस्तकबुद्धी त्यांच्यामध्ये दिसत नाही. ज्या प्रमाणात क्रांतिकारकांनी आपल्या देशासाठी आपल्या सर्व गोष्टींचा त्याग केला त्या ती सर्व पिढी विसरून गेली आहे.

**९) उज्वला मुजुमदार**

या बंगालमध्ये स्वयंसेविका होत्या. त्यांनी लेवंग रेस कोर्स येथील एडसन हत्याकांडामध्ये भाग घेतला व भूमिकत झाल्या. त्यामुळे स्पेशल क्रिमिनल केसंबधित वीस वर्षे फक्त मजुरीची शिक्षा झाली. १४ वर्षानंतर कैदीतून सुटल्यावर त्यांनी भारत छोडो आंदोलनात भाग घेतला .२१४० नंतर फॉरवर्ड ब्लॉकच्या सदस्या बनल्या समाज कार्य करत करत ते स्वातंत्र्य करण्यासाठी आपला खारीचा वाटा त्यांनी उचललेला दिसतो त्यांना यामध्ये फक्त मजुरीची शिक्षा सुद्धा झालेली दिसते.

**१०) लीलाताई पाटील व राजमती पाटील**

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेला महाराष्ट्रातील सातारच्या प्रीती सरकारच्या चळवळीत १९४२- १९४६ च्या लीलाताई पाटील व राजमती पाटील या स्त्रियांनी सहभाग घेतला. अळमनेरकचेरीवर मोर्चांनी जाऊन पोलिसांना केलेल्या मारहाणीत त्यांचा गर्भपात झाला व येरवडा जेलमध्ये शिक्षा झाली. तिथून सुटका करून घेऊन त्यांनी कुंडलयेथील स्त्रियांच्या क्रांतिकारी दलाचे नेतृत्व करून तुफान सेनेत स्त्रियांना लढण्याची शिक्षण दिले. वाळवा तालुक्यातील राजमती पाटील यांनी सोलापुरात शिकत असताना. विभूती कैलास चंद्र मेहता या कार्यकर्त्यांच्या साह्याने टिळक चौकात झेंडा फडकवला .त्यामुळे येरवडा जेलमध्ये कारावास भोगला. या चळवळीसाठी त्यांनी गोवा, बेळगाव, नाशिक या ठिकाणी बंदूके व काडतुसे गोळा करून प्रतिसरकार चळवळीतील क्रांतिकारकांना दिली. मदनूर येथे ब्रिटिशांबरोबर झालेल्या पोलीस चकमकीत त्या सहभागी होत्या. प्रति सरकारच्या भूमिका चळवळीतील क्रांतिकारी स्त्री म्हणून त्यांचे नाव नोंदवले गेले आहे. खेडेगावातील एका सामान्य कुटुंबात राहून अशा प्रकारे देशातील स्त्रिया आंदोलनात सहभागी होत होत्या त्यांना आपल्या जीवाची परवा नव्हती. तसेच कुटुंबाकडेही थोडफार दुर्लक्ष होत होते, पण त्यातून त्यांची जी देशसेवेची तळमळ ही दिसून येते कारण त्यांना अन्यायकारक जुलमी ब्रिटिशांना देशातून घालवून एक स्वतंत्र भारत निर्माण करायचा होता.

**इतर स्त्रिया**

अवंतिकाबाई गोखले चळवळीमध्ये मुंबई व महाराष्ट्रातील स्त्रिया मोठ्या संख्येने सामील झाल्या. महाराष्ट्र व मुंबईतील स्त्रियांची धरपकड झाली १९३० ते १९३२ या काळातील मुंबईतील स्त्रियांच्या चळवळीने भारताचे लक्ष वेधले. पारशी आणि ख्रिश्चन समाजातील शिक्षित स्त्रिया यामध्ये उतरल्या गुजराती स्त्रियांनी फार मोठ्या प्रमाणात यात भाग घेतला सरोजिनी नायडू आणि अवंतिका गोखले यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय स्त्री संघकार्य करू लागला. तर १९३० मध्ये देशसेविका संघाची सुरुवात झाली. महात्मा गांधीजींच्या इच्छेनुसार बेरिंग कॅप्टन हौसा मेहता, जयश्री रामजी, अवंतिकाबाई गोखले, कृष्णाबाई घुमटकर ,यशोदाबाई भट्ट, यांचे यामध्ये पुढाकार होता. या संघाच्या सभासदांनी संख्या ९०० पर्यंत गेली. त्यांची कॅप्टन कल्याण सय्यद ही होती. केशरी रंगाची साडी कमरेला पट्टा व कोट असा त्यांचा गणवेश होता .या दलांच्या कार्यात कमल व कुसुम सोहनी, बच्चू बाई वागळे, कृष्णा सरदेसाई, कावेरी चौधरी यांनी परिश्रम घेतले त्यामध्ये १२५ स्वयंसेविका होत्या. त्यांचे संचलन वेगवेगळे होत असे. नगरला हिंदसेविका संघाची स्थापना गांधीजींच्या विधायक कार्यात भाग घेण्याचे हेतूंने केली गेली.

बंगालमध्ये सी. आर. दास यांच्या विधवा भगिनी उर्मिला देवी यांनी महिलांना देश सेवेसाठी घर सोडण्यास आव्हान केले. बंगालच्या रस्त्यावर खादी विक्रीचे दुकाने सुरू केल्याने सी. आर. दास पकडले गेले. त्यांचे कार्यापुढे त्यांची बायको वासंती देवी बहिण-उर्मिला देवी व भाची सुनीती देवी यांनी लढा चालू ठेवला. त्यांनाही अटक झाली जमावाने निदर्शने करून त्यांना सोडवले त्यामुळे बंगालमधील स्त्रियांच्यात खादी चळवळ पसरली. सर्व प्रांतातील स्त्रिया गांधीजींच्या आव्हानाला प्रतिसाद देण्यासाठी पुढे येत होत्या. मद्रासच्या पूर्व गोदावरी जिल्ह्यातील स्त्रिया गांधींजीच्या भाषणाला हजर राहिल्या. दुव्वरी शुबम्मा हिने या मोहिमेत स्वतःला वाहून घेतले. १२ वर्षीय दुर्गाबाई देशमुख या लढ्यात उतरल्या. त्यांनी देवदासींची एक मीटिंग बोलवली त्यामध्ये त्या देवदासींनी वीस हजार रुपयांची मदत गांधीजींना देऊ केली. मदनामदेवी मुखोपाध्याय या वेश्या स्त्रिने १९२२ ते १९२४ या कालखंडात सी. आर. दासांच्या सत्याग्रह चळवळीत सहभाग दिला

सरलादेवी चौधरानी मुथ्थूलक्ष्मी रेड्डी, अमृत कौर यासारख्या स्त्रिया नेतृत्वासाठी तयार झाल्या चौराचौरी प्रकरणानंतर स्त्रियांच्या विधायक कार्यक्रमासाठी नेतृत्व तयार करण्यास महात्मा गांधींनी सुरुवात केली. त्यांनी सधन कुटुंबातील स्त्रियांना ग्रामीण व गरीब स्त्रियांचे प्रश्न हाताळण्यास सांगितले. राजकुमारी अमृत कौर या कपूरथला राज्यातील स्त्रीने गांधीजींची सेक्रेटरी म्हणून सोळा वर्षे काम केले व त्यांनी सुरू केलेल्या न्याय हक्काच्या संघर्षाबद्दल त्यांचे कौतुकही केले. सुशीला नायर या गांधीजींच्या डॉक्टर होत्या. त्या १९१९ पासून गांधीजींच्या कार्यात सहकार्य करीत मोतीलाल नेहरूंची बायको स्वरुपाराणी नेहरू त्यांच्या पुतण्याची बायको लाडू राणी कमला नेहरू घराण्यातील स्त्रिया सत्याग्रहात आल्या.

**उद्दिष्टे**

१) स्त्रियांच्या कार्याची महती सर्वांना कळावी.

२) स्वातंत्र्यासाठी स्त्रियांनी केलेले त्याग, बलिदान याची नव्याने ओळख व्हावी.

३) ककस्त्रियांच्याकल्पनाशक्तीची, नवनिर्मितीची, आधुनिक पिढीने प्रेरणा घ्यावी.

४) स्त्रिया या दुय्यम घटक नाहीत याची सर्वांना जाणीव व्हावी.

५) प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळापर्यंत इतिहासामध्ये असलेले स्त्रियांचे कार्य व स्वातंत्र्य चळवळीमध्ये असलेले त्यांचे योगदान याची माहिती सर्वांना करून देणे काही अनभिज्ञ स्त्रियांची नावे व त्यांची कार्य सर्वांना समजावे यासाठी प्रयत्न करणे.

६) ज्याप्रमाणे आपण जे पुरुष क्रांतिकारक किंवा त्यांनी स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले त्यांच्या जयंती पुण्यतिथी साजरी करतो आणि त्यांचे योगदान जगासमोर आणण्याचा प्रयत्न करतो त्याचप्रमाणे स्त्रियांच्याही कार्य योगदान जगासाठी कळावे यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष**

अश्मयुगीन काळापासून स्त्रियांचे अस्तित्व आणि कार्य मागे पडताना दिसते. त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवलेले दिसते. त्यांच्या कार्याची ओळख समाजापासून मागे पडताना दिसते. स्वातंत्र्य चळवळीत पुरुषांच्या बरोबरीने आपल्या

प्राण्याची परवा न करता स्त्रिया लढताना दिसल्या. पण त्यांच्या हक्काची समाजाने दखल घेतलेली दिसत नाही. आजही खेळ समाजकारण, राजकारण, शिक्षण, कला कौशल्य यामध्ये स्त्रिया अग्रेसर असताना दिसतात. अंतराळातही कल्पना चावला सुनीता विल्यम यासारख्या स्त्रिया जाऊन आलेल्या दिसतात. ऑलम्पिक मध्ये सुद्धा काही स्त्रियांनी आपल्या कार्याने ठसा उमटवला आहे. आपण स्वातंत्र्याची ७५वर्ष साजरी करताना त्या स्वतःसाठी काही काहींचे योगदान मोलाच आहे त्या अपेक्षित राहू नयेत तसेच स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे आहे. भारतात अशा कितीतरी स्त्रिया आहेत देशभरा मधील त्या चळवळी आणि आंदोलनामध्ये मनःपूर्वक सहभागी झालेल्या दिसतात. राष्ट्राच्या विकासासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी स्त्रियांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन दिले तर अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातला भारत स्वतंत्र व्हायला वेळ लागणार नाही. त्यांचा इतिहास त्यांनी केलेले कार्य वाचून फक्त सोडून दिले एवढेच न करता तर समाजाने आणि आत्ताच्या तरुण पिढीने कसा आत्मसात करून एक खंबीर नेतृत्व उदयाला येण्यासाठी कशाप्रकारे प्रयत्न करावे याची माहिती दिली पाहिजे. प्रस्तुतलेखात स्त्रियांच्या म्हणजेच निवडक स्त्रियांनी काही स्वातंत्र्य लढ्यात योगदान दिलं त्याची ओळख व्हावी म्हणून हा छोटासा प्रयत्न केलेला दिसतो. स्त्रियांनी केलेले आंदोलन किंवा भूमिगत राहून केलेले कार्य सत्याग्रह मध्ये त्यांचा असलेला सहभाग याची सर्वांना ओळख व्हावी यासाठी हा प्रयत्न केला आहे. सर्वांना स्त्रियांच्या क्रांतिकारकाची माहिती व्हावी यासाठी ठराविक निवडक स्त्रियांची माहिती दिली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील वेगवेगळ्या प्रांतातील क्रांतिकारी स्त्रियांचे कार्य अंधारात राहिले गुप्ततेमुळे त्यांच्या कार्याची माहिती जमा झालीच नाही. आर. सी. मुजुमदार यांच्या मते सशस्त्र उठाव ही क्रांतिकारकाची साधने नसून केवळ साधन आहे आणि तेही नाईलाजाने पत्करलेले होते. त्यामागे निश्चित विचारसरणी होती. अध्यात्मिक व तात्विक बैठक होती. सामान्य जनतेच्या प्रक्षेभाला ते वाचा फोडत होते, आणि म्हणूनच त्यांच्या हौतात्म्याची कदर सामान्य जनतेला होती. स्वातंत्र्य आंदोलनातील त्यांचे योगदान निश्चितच मौलिक स्वरूपाची आहे .भूमिगत चळवळीतील गुप्ततेमुळे कार्य करूनही अनेक स्त्रियांची नावे पुढे आली नाहीत. अप्रत्यक्ष स्वरूपात अनेक स्त्रियांनी क्रांतिकारकांना लपविण्याची, निरोप देण्याचे, जेवण देण्याचे, कार्य केले इतिहासात आजही म्हणले गेले नाही आपल्याला शेवटी नावे माहित नाहित. देश स्वतंत्र करण्यासाठी हजारो स्त्रिया या क्रांतिकारक बनलेल्या होत्या आणि त्या सामान्य कुटुंबातल्या होत्या.

**संदर्भ ग्रंथ**

1) खपडेकर विनया श्री स्वातंत्र्यवादीनी विसाव्या शतकातील परिवर्तन पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९९१

2) खिवसरा मंगला स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा संदर्भ स्वरुप प्रकाशन औरंगाबाद, २००५

3) डॉक्टर भागवत विद्युत भारतातील स्त्री अभ्यासाची वाटचाल स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ, २००५

४) भागवत कमल स्त्री चळवळीची वाटचाल प्राकृतिक पुस्तक प्रकाशन पुणे, १९८५

५) रानडे प्रतिभा स्त्री प्रश्नांची चर्चा १९ व्या शतक पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९९२

६) सरदेसाई माया महाराष्ट्राच्या सौदामिनी पुणे, १९९४

७) गवाणकर रोहिणी भारतीय महिला एवआजादी की लढाई नागोरी गांधी मुंबई गांधी स्मारक निधी मुंबई , १९९८

८) भारतीय स्वतंत्रता आंदोलन मे महिलाओं के योगदान सुरभी पब्लिकेशन जयपुर,१९९७

९) राधा कुमार स्त्री संघर्षका इतिहास (१८०० ते १९०० ) वाणी प्रकाशन दिल्ली

१०) डॉ. पाटील लीला भारतीय स्त्री जीवन मेहता बुक पुणे,१९९४

११);आयडी हार्डमन अनु भागवत विद्युत मार्क्सवादी आणि शिवाजी चळवळ यांचा बिघडलेला संसार अधिक पुरोगामी मिलापच्या दिशेने केलेला एक शोध श्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ, १९९६

१२) हिंगणे स्त्री शिक्षण संस्था -हिंगणे श्री शिक्षण संस्थेचे माणिक महोत्सव प्रकाशन पुणे, 1967

१३) नागोरी एस .एल .:मध्यकालीन भारतीय संस्कृती पॉयंटर पब्लिशर्स जयपुर भारतीय स्वतंत्रता आंदोलन नमे महिलाओं का योगदान, सुरभी पब्लिकेशन, जयपुर १९९७

१४) गांधी नंदिता शाह नंदिता: श्री संघर्षाची नवी रूपे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९४